**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१२२/२०१७ मधील**
**निशाणी क्र.४४ वर आदेश**
**CNR-MHLA110010222018**

---

१. सदरचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खालील तरतुदीनुसार दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिवादींनी कैफियतीसोबत प्रतिदावा दाखल केलेला आहे. त्या प्रतिदाव्यामध्ये नजरचुकीने मिळकतीचे वर्णन नमुद करावयाचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींना प्रतिदाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकुर नमुद करुन दुरुस्ती करावयाची आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ प्रतिदाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसुन वादीचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदर अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची सदर प्रतिवादींनी शेवटी मागणी केलेली आहे.

२. सदर अर्जाला वादीने म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. तसेच अर्ज मंजुर केल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार आहे. सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादींनी केवळ प्रकरण लांबविण्याकरिता प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची सदर वादीने शेवटी मागणी केलेली आहे.

३. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## **<u>का र ण मि मां सा</u>**

४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> –**

५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादीने निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादींनी कैफियत दाखल करुन दाव्यातील मागणी स्पष्टपणे नाकारलेली आहे. तसेच सदर प्रकरणातील प्रतिवादींनी नि.क्र.१७ ला कैफियतीसोबत प्रतिदावा दाखल केलेला आहे. सदर प्रकरणामध्ये नि.क्र.२२ ला मुद्दे काढण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणात वादीने स्वतःचा सरतपास नि.क्र.३६ ला दाखल केलेला असुन सदर वादीच्या उलटतपासाकरिता प्रकरण प्रलंबित असताना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरण अंशतः

सुनावणीकरिता प्रलंबित असल्याचे स्पष्ट होते.

६. सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरिता असले तरी अद्याप प्रतिवादींतर्फे वादीचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. सदर अर्जाद्वारे प्रतिवादींना प्रतिदाव्यामधील परिच्छेद क्र.९ मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे मिळकतीच्या वर्णनाबाबत दुरुस्ती करावयाची असल्याचे दिसुन येते. सदर अर्जातील कथनाच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.२ ने प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणाचे स्वरुप व पक्षकारांमधील वादाचे स्वरुप विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी प्रतिवादींना प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास संधी देणे न्यायोचित होणार आहे. तसेच प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती केल्यानंतर वादीला बचाव मांडण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे सदर प्रकरणाचे स्वरुप, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित दुरुस्ती ही प्रतिदाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

७. वर नमुद चर्चेवरुन स्पष्ट होते की, सदर प्रकरण अंशतः सुनावणीकरिता प्रलंबित असुन सदर अर्जामुळे प्रकरण निकाली निघण्यास आणखी विलंब होणार आहे. त्यामुळे सदरचा विलंब खर्चाच्या स्वरुपात भरुन काढणे देखील महत्त्वाचे आहे.

त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींवर खर्च बसवुन मंजूर करणे न्यायोचित होणार आहे.

सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.४४ वरील अर्ज प्रतिवादींवर रक्कम रु.४००/– खर्च बसवुन मंजूर करण्यात येत आहे.

२. वर नमुद खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीला पुढील तारखेपर्यंत द्यावे अथवा न्यायालयामध्ये जमा करावे.

३. प्रतिवादींनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रतिदाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त प्रतिदाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–
(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

दि. २०.०८.२०१९.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 20.08.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 20.08.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 21.08.2019 |